International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# २१ अधिनिक मराठी साहित्यातील उपेक्षितांची कादंबरी- चौंडक

**सोमनाथ रामचंद्र पावडे[1], डॉ. द्रोपदी पंदिलवाड[2]**

*[1,2]महात्मा गांधी विद्यामंदिर,*

*कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मनमाड, ता. नांदगाव जिल्हा नाशिक.*

*Corresponding Author –* **सोमनाथ रामचंद्र पावडे**

**DOI - 10.5281/zenodo.18654427**

***गोषवारा :***

*भारतवर्षात अनेक परंपरा, चालीरीती, धार्मिक बंधने प्रकर्षाने दिसतात कारण, भारत हा अनेक धर्मीय व जातीय बंधनाने बांधलेला आहे. या प्रत्येक धर्मात, जातीत अनेक सामाजिक, पारंपारिक, बंधनाने जखडलेला आहे. यातूनच उपेक्षित समाजाची निर्मित झालेली आहे. जसे देवदासी, देवकी, जोगत्या, भाविनी यांना उपेक्षित जीवन जगावे लागते. २१ व्या शतकातील मराठी साहित्यात उपेक्षित व वंचित समाजघटकांचे जीवनानुभव केंद्रस्थानी आलेले आहे. सामाजिक वास्तववादातून प्रगत झालेल्या या साहित्यप्रवाहात चौंडक ही कादंबरी उपेक्षित समाजाच्या अस्तित्वसंघर्षाचे, सामाजिक शोषणाचे व अस्तित्व जाणीवेचे सखोल दस्तऐवजीकरण करणारी महत्त्वपूर्ण साहित्यकृती आहे. सदर शोधनिबंधाचा उद्देश चौंडक कादंबरीतील उपेक्षितांचे सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवनविश्वाचा समग्र अभ्यास करणे हा आहे.*

*संशोधनातून असे आढळून येते की, चौंडक कादंबरी उपेक्षितांच्या जीवनातील वास्तव केवळ मांडत नाही, तर सामाजिक विषमता, जात-वर्गीय भेद व सांस्कृतिक वर्चस्व यांविरोधात प्रश्न उपस्थित करते. त्यामुळे २१ व्या शतकातील मराठी कादंबरीपरंपरेत उपेक्षितांचे प्रतिनिधित्व समजून घेण्यासाठी चौंडक ही कादंबरी महत्त्वाची आहे.*

***कीवर्ड: उपेक्षित समाज, देवदासी पद्धती, उपेक्षित जीवनानुभ, शोषण अन्याय, चौंडक.***

**प्रास्ताविक:**

आधुनिक मराठी साहित्याला अनेक विध बदल स्वीकारावे लागले. समाजातील मानवी जीवनातील, परंपरेतील, धार्मिकतेतील ह्या बदलांमुळे साहित्याच्या लेखनाची दिशा बदली. समाजातील प्रत्येक घटक साहित्यातील भाग झाला. जो समाजात उपेक्षित घटक होता, तो पण एक साहित्याचा भाग झाला. त्या समाजाचे जगणे, दुःख, सामाजिक दृष्टीकोन, अवहेलना आधुनिक साहित्यात चित्रित होऊ लागली. साहित्यातील कविता, कथा, कादंबरी व नाटक या सर्वच साहित्य प्रकारांनी उपेक्षित समाजाचे चित्रण केले. कारण साहित्य हा समाजाचा आरसा असतो. सजतील सर्च घडामोडी व घटना साहित्यात चित्रित होत असतात. याच दृष्टीने राजन गवस यांची 'चौंडक' ही १९८५ मध्ये प्रकाशित झालेली कादंबरी अतिशय महत्व पूर्ण आहे. देवाच्या नावावर समाजातील राक्षसी वृत्तींनी निर्माण केलेल्या प्रथेच्या बळी ठरलेल्या देवदासी स्त्रियांची होरपळ या कादंबरीत मांडलेली आहे. 'देवदासी' तिच्या घरच्यांच्या धर्मिक भिती मुळे तिला देवदासी केले जाते पण, तिचे पुठील आयुष्य काय ? असेल, तिचे समाजातील स्थान काय? असेल याचा कोणताही विचार न करता आपल्या स्वतःच्या किंवा कुटुंबातील इतरांच्या सुखा साठी तिला बळी दिले जाते. देव आणि धर्माच्या अंध श्रद्धेचे बळी

'देवदासी' होत आहे. याचे अतिशय वास्तव चित्रण राजन गवस यांनी 'चौंडक' कादंबरीत मांडलेले आहे. आधुनिक मराठी साहित्यात उपेक्षित समाजाची दखल अतिशय प्रभाविपणे घेतलेली आहे.

**उपेक्षित कोणास म्हणावे ?**

सामाजिकदृष्ट्या सवर्ण मानल्या गेलेल्या जातीव्यतिरिक्त अन्य जाती- जमातीच्या व्यक्तींना आणि भटक्या-विमुक्तांना उपेक्षित मानले गेले. कारण चातुर्वण्य व्यवस्थेत कनिष्ट जातीतील व्यक्तीवर अनेक पिढ्या सामाजिक अवहेलनेचे, दारिद्र्याचे जीवन समाजाने लादले आहे. अशा जातींतील माणसांना प्रगत पारंपारिक शिक्षणापासून वंचित ठेवले गेले होते. गावगाड्यातील विशिष्ट कर्मबंधनानी त्यांचे जीवन जखडून टाकले होते. त्यामुळे त्यांना व्यक्तिविकासाचे मार्ग मोकळे राहिले नाहीत. असे दलित, पददलित आणि भटके यांना उपेक्षित समाजाच्या मुख्यधारेत सन्मानाचे स्थान राहिले दिसत नाही. समाजातील अशा घटकांवर प्रस्थापित समाजाने अस्पृश्यता लादली आणि त्याच्यावरील अन्याय अत्याचाराची परिसीमाही गाठली होती. समाजातील त्यांचे स्थान क्षुल्लक ठरविले आहे.

वरील सर्व आशयाचे वर्णन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबई येथे भरलेल्या पहिल्या महार परिषदेमध्ये केले होते. ते म्हणतात- "अस्पृश्यता ही काय बाब आहे व तिचे खरे स्वरूप काय आहे, याचा तुम्हांस समज व्हावा म्हणून प्रथम तुमच्यावर होत असलेल्या जुलमांच्या कहाणीची तुम्हांला आठवण करून देणे आवश्यक वाटते. सरकारी शाळेत मुले घालण्याचा हक्क सांगितल्यामुळे, विहिरीवर पाणी भरण्याचा हक्क सांगिल्यामुळे, वरात घोड्यावरून नेण्याचा हक्क सांगितल्यामुळे स्पृश्य हिंदूनी मारहाण केल्याची उदाहरणे नेहमीच घडत असल्या कारणाने ती सर्वांच्या डोळ्यांपुढे नेहमीच असतात. परंतु मारहाण करण्याची दुसरी अनेक कारणे आहेत की, ज्यांचा उल्लेख केला असता हिंदुस्थानाबाहेरील लोकांस तरी त्यांचा विस्मय वाटेल. उंची पोषाख घातल्यामुळे मारहाण केल्याचे उदाहरण देता येईल. दागदागिना घातल्यामुळे मारहाण केल्याचे उदाहरण देता येईल. पाणी आणण्याकरिता तांब्यापितळेची भांडी वापरल्यामुळे मारहाण केल्याचे उदाहरण देता येईल. जमीन खरेदी केल्यामुळे जाळपोळ केल्याचे उदाहरण देता येईल. जानवे घातल्यामुळे मारहाण केल्याचे उदाहरण देता येईल, मेलेली गुरे न ओढल्यामुळे व मेलेल्या गुरांचे मांस न खाल्यामुळे मारहाण केल्याचे उदाहरण देता येईल. पायात बूट व मोजे घालून गावात गेल्यामुळे, शौचाला जाताना तांब्यात पाणी नेल्यामुळे छळ केल्याचे उदाहरण देता येईल... मोल मजुरी मिळू द्यायची नाही, रानातून गुरांना जाऊ द्यायचे नाही वगैरे सर्वप्रकारची बंदी करून स्पृश्य हिंदू लोकांनी जेरीस आणण्याची आठवण तुम्हांपैकी पुष्कळांना असेल."[१] या प्रकारे गावगाड्यातील दलितांच्या अन्यायाला कोणतीच दिशा नव्हती. ते सारेच लोक उपेक्षित मानले गेले. यांना गावगाड्यात अलुतेदार-बलुतेदार म्हणून मान्यता देण्यात आली होती, तरी त्यांच्यावर अन्याय होतच होते. तसेच समाजातील भटक्याविमुक्तांनाही कोणत्याही प्रकारचे उच्चस्थान, श्रेष्ठत्व, प्राप्त नव्हते.

या भटक्या- विमुक्तांची मोठी नामावळी त्रिं. ना. आत्रे यांनी आपल्या गावगाडा या पुस्तकात दिली आहे. ते म्हणतात- " फिरस्ते नेमलेल्या गावी वहिवाटीप्रमाणे न येता वाटेल तेथे भटकतात त्यांना आपण उपलाणी म्हणू. धिसाडी ऊर्फ पांचाळ, बेलदार, वड्डर, कैकाडी, वंजारी, लमाण, नेमाडातील मेवती, वैदू, गोंड, मांगगारोडी, गोपाळ, कोल्हाटी, हरदास, दरवेशी, बंदरवाले, माकडवाले, कंजारी, नंदीबैलवाले ऊर्फ तिरमल, चित्रकथी, फासेपारधी, बहुरूपी, रायरंद, भोप्ये, भगत, भुत्ये, आराधी, वाघे, मुरळ्या, जोगते,

हिजडे, जोगतिणी, कातकाडिणी, (हाडकांच्या माळा घालणाऱ्या), भराडी, वासुदेव, पांगूळ, बाळसंतोष, राऊळ, मेढिंगे, जोशी कुडबुडे जोशी, सुपहलव्या, पोतराज, कानफाटे, उदासी, अघोरी, खरेखोटे आंधळे, पांगळे, रक्तपित्ये, नाथपंथी, वारकरी, कबीरपंथी, संन्यासी...इ. अनेक प्रकारचे लोक उदरनिर्वाहानिमित्त बहुकृत वेषे लोक खळी मागण्यास व इतर वेळी खेड्यावर फेऱ्या घालतात... त्यांपैकी कित्येकांचा कलाकुसरी अगर मनोरंजनाचा दर्शनी धंदा असतो व काही निखळ भिक्षेसाठी असतात".[२] या वरून देवासी ही पण सामाजिकदृष्ट्या उपेक्षित, दुर्लक्षित आहे.

**चौंडक मधील उपेक्षित जीवन शैली** राजन गवस यांची पहिली 'देवकीच्या' जीवनावरील पहिली कादंबरी आहे. पण ती पहिली वाटत नाही. कारण या कादंबरीतील त्यांची प्रतिभा एखाद्या प्रगल्भ लेखकाचीच जाणवते. 'चौंडकं' कादंबरीची नायिका 'सुली' या 'देवदासीच्या दुःखद जीवनाचे दर्शन घडवले आहे. सुलीचा जन्म एका शेतकरी गरीब कुंटूंबात झालेला. लहान वयातच अंधश्रध्देची बळी ठरून तिच्या निष्पाप जीवनाची वाताहत झालेली. तिचे वडील लोकांच्या शेतात शेतमजुरी करतात. कुंटूंबातील दारिद्र्यामुळे तिच्या डोक्यावरील केसाला तेल लावायला न मिळाल्यामुळे केसांचा गुंता होवून जट निर्माण होतात. ही जट म्हणजे देवीचा कोप अशी तिच्या आईची समजूत हेऊन, देवीच्या कुंटुंबात कार्यक्रम साजरे केले जातात.

'चौंडकं' कादंबरीत ही 'सुली' प्रवाहपतीत पद्धतीने रंगवली आहे. बहुतांश देवदासी ह्या अशा प्रवाहीच असतात.देवादासिच्या जीवनाचे भोग सुलीलाही भोगावे लागतात.पण सुलीच्या माध्यमातून समूह- जीवनाचे तपशीलवार चित्रण 'चौंडकं' कादंबरीत राजन गवस मांडले आहे. सुलीच्या निमिताने बारीक-सारीक गोष्टी देवदासी जीवनाच्या संदर्भात 'चौंडकं' मधून मांडल्या आहे. समाजशास्त्रीय समस्येचे साहित्यातील वास्तवात परिवर्तन करणे सोपे नसते. ते राजन गवस यांनी 'चौंडकं' कादंबरीतून अतिशय प्रभावी पणे मांडले आहे. याचे कारण 'चौंडकं' कादंबरीत तसे व्यक्तीला प्राधान्य नसून. देवादासिग्रस्त व्यक्ती व सभोवतालच्या अंधश्रध्द समाजाला आहे.

या कादंबरी विषयी प्रा.डॉ. अनिल बोपचे म्हणतात, "प्रस्तुत कादंबरीमध्ये गवसांनी देवदासी - जोगतिणीच्या कटू जीवनाचे यथार्थ दर्शन घडविले आहे. या कादंबरीची नायिका 'सुली' हिच्या जीवनाची ही शोकात्म कथा आहे. देवदासी म्हणजे आपल्या समाजातील देव, धर्म, अनिष्ट रूढी- परंपरांचा बळी ठरलेली स्त्री आहे. 'जोगतीण देवाची, मालकी गावाची' ही आपल्या बोलीतील म्हण जोगतिणीच्या जीवन जगण्याचे सार सांगते. गवस यांनी देवाच्या नावावर समाजातील राक्षसी वृत्तींनी, अंधश्रद्धावादी वृत्तींनी निर्माण केलेल्या प्रथेच्या बळी ठरलेल्या देवदासी स्त्रियांची होरपळ या 'चौंडकं' कादंबरीमध्ये विस्तृत स्वरूपात वाचकांसमोर मांडली आहे. बोलीची सर्व सामर्थ्य पचवून स्त्री - दुःखाचा स्त्री-दुःखाचा नेमका वेध राजन गवस यांनी 'चौंडकं' मध्ये घेतला आहे. देवदासीच्या जगण्यातील सर्व दुःख आणि तिच्या समस्यांचा वेध घेणारी कादंबरी म्हणून 'चौंडक'ची नोंद विशेषत्वाने करावी लागते. या विविध वैशिष्ट्यांमुळे 'चौंडकं' ही मराठीतील देवदासींच्या जीवनावरील वेगळेपण दाखविणारी कादंबरी ठरते."[३] म्हणजे आपणच निर्माण केलेल्या प्रथा या आपल्यासाठीच किती घातक ठरतात.

बायजा ही 'सुलीची आई व सुबान हे तिचे वडील. पण बायजाच्या हट्टी स्वभावामुळे सुबानाचे काहीच चालत नाही. बायजा तानु जोगतीणीला घेऊन आमावस्येच्या दिवशी टिटणीच्या आक्कू जोगतीणीकडे देवरूखपण बघण्यासाठी सुलीला घेऊन जातात. आक्कू

जोगतीणीच्या सोप्यातील गर्दी पाहून बायजाची श्रद्धां अधिकच दृढ होते. आक्कू जोगतीण डुलत म्हणते 'मला पोरीचे क्यास आवडल्यात आता हात लावू नगं ते माझे हाईत!' तेव्हा सर्व जण घाबरून देवीचे महात्म्य आठवू लागतात.

'बायजाचा' सतत दुखणारा हात आणि आजीचे आजारपणाचा संबंध देवीच्या कोपाशी जोडला जातो. सुबाना घरातून न बोलताच बाहेर निघून जातो. सभोवतालचे लोक आणि कुंटूंबातील मंडळीच्या श्रध्देपुढे हातबल होतो. तेव्हा सुलीला यल्लम्मा देवीला सोडण्याचे निश्चित केले जाते. हे सर्वच कुंटूंब अंधश्रध्देला बळी पडल्यावर त्यांच्या अंर्तमनातील खळबळ लेखक हळूवारपणे मांडतात आणि कथानकाला यामुळे गती प्राप्त होते. सुलीला देवीला सोडायचे निश्चित केले जाते. आक्कू जोगतीण, सुलीची मावशी शेवंताक्का, शांताबाई व भैरू मोहिते हे मंडळी सुलीला देवदासी म्हणून सोडण्यावर शिक्कामोर्तब करतात. उदा. 'उदं गं आई उदं उद' असे म्हणत गंगू जोगतिणीच्या अंगात येते व ती ओरडून म्हणते 'मी घरात येणार नाही, ह्या घरात मला डोंगरस्न आणाय पाहीजे' हे ऐकून सर्वांनाच धक्का बसतो.

तानू जोगतीणीच्या सल्ल्याने म्हाईच्या पुनवेला देवदेव करण्यासाठी, सुबाना आपली जमीन गहाण ठेवून पैसे उभेकारतो. सुलीला डोंगराच्या देवीला निले जाते. त्यावेळी अनेक लोक हळहळ करतात, पण कोणीही विरोध करत नाही की थांबवत नाही. तानू जोगतीणीच्या म्हणण्याप्रमाणे प्रथम सुलीची पुजा केली जाते. बायजा ही सुलीला नदी काठाला नेऊन अंगावर पाणी टाकून लिंब नेसवते आणि स्वतः ही लिंब नेसते. लिंब नेसलेल्या सर्व व्यक्ती नदीच्या काठी एकत्र पूजा करतात. प्रत्येकजण नैवद्य, नारळ नदीत टाकतो. गर्दीत सुलीला उघड्या गंगाची लाज वाटते. यल्लम्मा देविला परड्या भरण्यासाठी सर्व भाविक नैवद्यासह परड्या घेऊन येतात. बायजाच्या परडीत पुरणपोळीच्या नैवेद्याने पुजा करते. प्रत्येकजण यल्लम्मा देवीचं उदं उदं करत म्हणतात-काय बाईचा म्हयमा गा बघावं तिकडं माणूसच माणूस अच्चारबाबा यात्रेत सर्वजण भंडाऱ्यानी माखली जातात. एका मेळ्यातील एक म्हातारी सुलीच्या गळयात कवड्याची माळ परिधान करते. चार लिंबाच्या काड्या कमरेभोवती लावायला सांगते. केसाच्या जटेला भंडारा माखून घेते. नवीन कपडे घालते. हातामध्ये सुपारी, नारळ व पानाचा विडा देते. पूर्वेकडे तोंड करून बसायला लावून हातात परडी देते. सुलीच्या गळयात कवड्याची माळ घालून यल्लू आईच्या कळसाकडे बघून उदं गं आई उदं असे पाच वेळा घुमून म्हणते. आणि जमलेल्या सर्व जोगतिणी चौंडक्याचा ताल धरून गाण्याला सरूवात करतात.

इकडे सुलीला म्हाईच्या पोर्णिमेला देवदासी म्हणून सोडले जाते. या दिवसापासून सुलीचा वेश बदलतो. डोंगराच्या देवीसंगे लग्न लावल्यामुळे तिच्या डोक्यावर परडी, कमरेला लिंबू, कपाळावर भंडारा आणि काखेमध्ये चौंडकं येते. अशा प्रकारे सुली आई-वडिलांच्या अंधश्रद्धेमुळे व अज्ञानामुळे बळी पडते. या सुलीच्या वेशाकडे पाहून गावातील लोक टवाळकी करू लागतात. तेव्हा वाचकांचे अंतःकरण हळहळते. अतिशय कारुण्यमय अशी सुलीच्या आयुष्याची परवड सुरु होती. ही तिच्यासारख्या परंपरागत खोलवर रूजलेल्या सण-उत्सव, देवधर्म कार्यक्रमामुळे व अंधश्रद्धेमुळेच सुबानाच्या कुटुंबाची व सुलीच्या जीवनाची वाताहत होते. वाईचा गर्भपात होतो तर आईला अर्धांगवायूचा झटका येतो. कुटुंबातील दारिद्र्यात अधिकच भर पडत जाते. आणि सुली म्हणते 'देवाचंच निघाल देवानेचं सांगितल आता गावभर फिरतेय बाई' [४] अशी नशीबावर हवाला ठेवून फिरते. सुली देवदासीची अवस्था पाहून शेवन्ता जोगतीण म्हणते- "देव

बी गरीबाचा न्हाई या सोन्यागत पोरींचं देवानंच वाटोळ केलं." मानवी जीवनात नैसर्गिक लैंगिक भावनांमूळे सुलीला गावातील बबन्या तरूणापासून दिवस जातात. त्यांची गावभर चर्चा होते ती शेवन्ताला म्हणते. बबन्या घर करून देतोय म्हणतोय तेव्हा ती म्हणते- खुळी आहेस लेकी... आपण देवाच्या रांडा आपल्या बरूबर संसार कोण करल आसलं खुळ काय धरू नगसं, सरळ मोकळी हो जा! असा गर्भपात करण्याचा सल्ला दिला जातो. सुबाना कुळाला बट्टा लावला म्हणून तिला मारझोड करून गळा दाबतो. बायजा तिला सोडवते. बायजाला अपराधी वाटू लागते. आपणच सुलीच्या आयुष्याचं वाटोळं केल्याची बोचणी लागून ती अन्नपाणी सोडून देते व त्यातच तिचा मृत्यू होतो.

बायजाचा मृत्यू झाल्यामूळे सुबानाचे सर्व कुंटूब कोलमडून जाते. पुढे सुलीचाही देवदासी संप्रदायावरचा विश्वास कमी होतो. सुबाना अबोल होतो. लेखक गवस या कांदबरीतून शेतकरी कुटूंबातील देवदासी अंधश्रध्देची भयावता, सामाजिक दांभिकता, स्त्रीच्या दुःखद जीवनातील कारुण्य कहानीतून प्रकाश टाकला आहे. या कादंबरीच्या निमित्ताने राजन गवसांनी देवदासी प्रथेचे भेदक चित्रण केले आहे. या कादंबरीबद्दल आपले विचार व्यक्त करताना उत्तम कांबळे म्हणतात, "डोईवर देवीची परडी आणि गळयात चौंडकं अडकवून दारोदार जोगवा मागणाऱ्या सुलीवर, तिच्या तारुण्यावर गावगुंडाच्या नजरा डसतात. देवाच्या बाईच्या वाट्याला हे असं का यावं, हा सुलीच्या मनात वारंवार उद्भवणारा प्रश्न. देवदासींच्या उपेक्षित जीवनाचे समर्थ दर्शन या कादंबरीत घडतं" [५] या वरून उपेक्षित जीवनाचे वास्तव, उपेक्षित जीवनाचे अनुभाव, वेदन या आपलाच समाज आपल्याला देतो आहे. याचा अनुभव येतो.

कादंबरीच्या शेवटी सुलीचा मृत्यू होतो पण तिच्या पोटी मुलीचा जन्म होणे हा योगायोग ? देवदासी प्रथा हव्यातपणे चालणार का ? असे प्रश्न वाचकांच्या मनात उमटतात. या प्रसंगी शेवंताक्का म्हणते- 'आई म्हतमाची बया म्हणून तुझी सेवा केली खरं तुबी माणसागत खोटीच.' तुझी जन्मभर उगचच सेवा केली हया भंडाऱ्याची माती झाली असा ती ही देवदासी संप्रदायातील फोलपणा प्रकट करते. असा कादंबरीच्या शेवटी कथानकाला कलाटणी देणारा आहे. उपेक्षित जीवन जगतांना, उपेक्षित समाजातील उपेक्षित समाजाकडूनच, उपेक्षित व्यक्तीवर अन्यान अत्याचार केले जातात याचे उत्तम उदाहरण म्हणजे कादंबरी होये.

**निष्कर्ष:**

१. भारतीय चालीरीती, परंपरामुळे स्त्रियांना अनेक प्रकारचे दुःख सहन करावे लागले. तिची इच्छा नसतांना तिच्यावर या सर्व चालीरीती, परंपरांचे बंधने लादली गेली. तिचे वैवाहिक आयुष्य संपुष्टात येते.
२. देवादासीने प्रथे प्रमाणे सर्व बंधने स्वीकारून सुद्धा शेवटी तिच्या वाट्याला उपेक्षित जीवनाचेच भोग आले. धर्मा व देवाच्या नावाखाली तिने ते स्वीकारले पण.
३. देवदासी ही प्रथा दारिद्र्य, अंधश्रध यातून पुढे आले. पण हे सर्वात मोठ्या प्रमाणात दलित वर्गात दिसते. या कारण, पोटाची खळगी भरण्यासाठी, शिक्षणाचा अभाव या गोष्टी पण त्याला कारणीभूत आहे.
४. आधुनिक युगात पण, भावीण, देवदासी, मुरली या स्त्रियांकडे उपेक्षित दृष्टीनेच पहिले जाते आहे. त्यांना सामान्य, उच्चवर्गीय स्त्रीचा दर्जा अजून पण मिळालेला नाही.

**संदर्भ ग्रंथ:**


१. डॉ. आंबेडकर बाबासाहेब : मुक्ति कोन पथे ? शतकातील दलित विचार, संपा. शरणकुमार लिंबाळे, दिलीपराज प्रकाशन, पुणे आ. प्रथम, २००१ पृ. १२१

२. आत्रे त्रीं. ना. : गावगाडा ; संपा. ह.अ. भावे, वरदा बुक्स पुणे, आ. तिसरी, १९८९ पृ.१२१

३. बोपचे अनिल (डॉ.), 'कादंबरीकार राजन गवस', विजय प्रकाशन नागपूर, प्र.आ. १ ऑगस्ट २०१७ पृ. १३

४. गवस राजन, 'चौंडकं', मेहता पब्लिशिंग हाऊस, आ. चौथी, पुनर्मुद्रण जून २०१७, पृ. ७१

५. बोपचे अनिल, (डॉ.), (उत्तम कांबळे, संदर्भ) 'कादंबरीकार राजन गवस', विजय प्रकाशन नागपूर, प्र.आ. १ ऑगस्ट २०१७ पृ. १३